# स्त्रीवाद

(काल आणि आज)




संपादक

डॉ. प्रतिभा एस. जाधव

Scanned by CamScanner

# स्त्रीवाद

(काल आणि आज)

संपादक

डॉ.प्रतिभा सुरेश जाधव

आधार पब्लिकेशन्स, अमरावती

Scanned by CamScanner

# स्त्रीवाद (काल आणि आज)

■ डॉ.प्रतिभा सुरेश जाधव

■ प्रथम आवृत्ती – दि. ८ मार्च २०२२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

**ISBN-** 978-93-91305-96-3

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख | लेखक | पु.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | स्त्रीवादी मानसशास्त्र | श्रीमती गिरी अश्विनी अशोक | 1 |
| 2 | स्त्रीवादी साहित्य: भूमिका आणि स्वरूप | डॉ. संजय शेजव | 10 |
| 3 | एकविसाव्या शतकातील नव्या जाणीवांचे स्त्रीवादी मराठी साहित्य | प्रा. सौ. सुनिता प्रदिप रंगारी | 18 |
| 4 | साहित्य क्षेत्रातील महिलांचे योगदान | प्रा. डॉ. अनुराधा रा. मुळे | 26 |
| 5 | मराठी स्त्रीवादी साहित्य | प्रा.डॉ. मेघमाला अं. मेश्राम | 30 |
| 6 | स्त्री कालची आणि आजची | सौ .रुपाली राहुल जाधव | 36 |
| 7 | भारतातील स्त्री-मुक्ती चळवळ | प्रा. डॉ. रविंद्र वाघ /वैशाली अशोकराव निकम | 38 |
| 8 | भारतीय स्त्रीवाद: समस्या आणि उपाय | योगेश्वर रमेश जोगी | 51 |
| 9 | स्त्रीवाद : - मूळ आणि विकास | डॉ. गोपालकृष्ण गणपतराव कुंभरे | 59 |
| 10 | स्त्रीवाद—सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय | डॉ. अस्मिता आर. ठोंबरे | 69 |
| 11 | स्त्रीवादी साहित्य : इतिहास, संकल्पना व स्वरूप | प्रा.डॉ.दीपक सूर्यवंशी | 79 |
| 12 | स्त्रीवाद आणि स्त्रीमुक्ती | प्रा. डॉ. अरविंद बा. पाटील | 86 |
| 13 | मराठी साहित्य व स्त्रीवाद | डॉ. सुवर्णा राजेश जाधव | 92 |


Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | भारतीय स्त्री-वाद, समस्या व उपाय | सौ. शैलजा चंद्रकांत जाधव | 102 |
| 15 | स्त्रीवाद आणि भारतीय कामकरी महिला | प्रा.डॉ.राखी श्रीराम तुरस्कर | 108 |
| 16 | अजून स्त्री 'व्यक्ती' का नाही? | कु.उज्वला नामदेव जानवे | 115 |
| 17 | स्त्रीवाद आणि मानवी हक्क | डॉ. कैलाश वि. बिसांद्रे | 123 |
| 18 | स्त्रीवादाच्या पाऊलखुणा | डॉ. छाया महाजन | 132 |
| 19 | स्त्रीवादाचे मुख्य प्रवाह | प्रा. भोजराज व्ही. बोदेले | 140 |
| 20 | अजून स्त्री 'व्यक्ती 'का नाही ? | श्रीमती अर्चना युवराज मोरे | 147 |
| 21 | स्वातंत्र्यपूर्व भारतातील स्त्रीवादी चळवळी आणि मतदानाच अधिकार | रविराज अंबादास वटणे | 149 |
| 22 | स्त्रीवादी चळवळ आणि आधुनिक विचारधारा | Dr. Aruna S Thool (Deogade) | 158 |
| 23 | पितृसत्ताक व्यवस्थेविरोधातील संघर्षकथा:जनाक्का शिंदे | डॉ.सुभाष बेंजलवार | 165 |
| 24 | स्त्रीवाद : एक चळवळ | Dr.Vijay Krushnarao Kale | 176 |


Scanned by CamScanner

# पितृसत्ताक व्यवस्थेविरोधातील संघर्ष कथा : जनाक्का शिंदे

डॉ.सुभाष बेंजलवार

इतिहास विभाग प्रमुख महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा ,sbenjal@gmail.com

---

आधुनिक जगाच्या इतिहासात विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री प्रश्नांच्या अनुषंगाने ज्या चळवळी झाल्या त्यातूनच स्त्रीवादाची सुरुवात झाली असे मानले जाते. परंतु भारतीय इतिहासाचा विशेषतः समाज सुधारणा चळवळीचा विचार केला तर जगाच्या तुलनेत भारतात स्त्री प्रश्नांच्या अनुषंगाने एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासूनच या चळवळींना सुरुवात झाली होती. या चळवळीमधूनच स्त्रीवादी विचारधारेला सुरुवात झाली होती. स्त्रीवाद या संज्ञेचा शब्दशः विचार केला तर फेमिनिझम या इंग्रजी शब्दाचा तो मराठी अनुवाद होय. परंतु स्त्रीवाद या संज्ञेचा वास्तविक अर्थ मात्र व्यापक स्वरूपाचा आहे. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीच्या दृष्टीकोनातून जीवनाच्या सर्व पैलूंवर टाकलेला प्रकाश होय. स्त्रीवाद हि एक जाणीव आहे. ते एक जीवनविषयक तत्वज्ञान आहे. त्याचबरोबर ती एक संघटीत कृतीसाठीची साद देखील आहे. सारांशाने स्त्री पुरुषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार म्हणजे स्त्रीवाद होय. या अर्थाने भारतातील समाज सुधारणा चळवळी स्त्री प्रश्नांच्या अनुषंगाने समाज जीवनात अस्तित्वात असलेल्या विविध संस्था व प्रथांचा पुनर्विचार करीत होत्या. या सुधारणा चळवळीस महाराष्ट्रातील बुद्धीजीवी सुधारकांनी अधिक व्यापक बनवले. त्यांच्या सुधारणांच्या केंद्रस्थानी स्त्रीप्रश्न हाच विषय होता. विशेषतः महात्मा फुलेंनी जे स्त्री उद्धाराचे कार्य केले त्यातून प्रथमतः स्त्रीवादाची भावना वृद्धिंगत होत गेली.

महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधकी विचारधारेतूनच पहिल्या स्त्रीवादी लेखिका ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध लिहिला. या निबंधाच्या प्रस्तावनेतच त्यांनी म्हटले आहे की,'ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी निर्माण केली, त्यानेच स्त्री पुरुष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहास दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषांत आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखवावे याच हेतूने हा निबंध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचिला आहे.' (कोतापल्ले:२०१०:२९) हा ताराबाई शिंदेंचा निबंध म्हणजे भारतीय स्त्रीवादाची सुरुवात होय. ताराबाई यांनी मांडलेला स्त्रीपुरुष तुलनेचा विचार हा ख-या अर्थाने स्त्रीच्या दृष्टीकोनातून टाकलेला स्त्री जीवनावर टाकलेला प्रकाश होता. हाच विचार नंतरच्या काळात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि त्यांच्या भगिनी जनाक्का शिंदे यांच्या सुधारणावादी कार्यात



Scanned by CamScanner

पहावयास मिळतो. महर्षी शिंदे हे सामन्य शेतकरी कुटुंबातून उच्च शिक्षण घेतलेले सुधारक होते. शिक्षण व प्रार्थना समाजाच्या प्रभावातून त्यांनी सुधारणावादी कार्याला स्वताला वाहून घेतले होते. त्यांच्या सुधारकी विचारांमुळेच त्यांच्या भगिनी जनाबाई शिंदे उर्फ जनाक्का यांना प्रेरणा मिळाली आणि त्यांनी स्त्रीपनाचे तथाकथित समाज ओझे झुगारून देऊन सुधारणेचे कार्य केले. जनाक्का शिंदे यांचे जीवन चरित्र व त्यांनी केलेले कार्य हे स्त्रीवादाचे एक उत्तम उदाहरण आहे. प्रस्तुत लेखात जनाक्का शिंदे यांच्या जीवन चरित्रातील प्रसंगांच्या माध्यमातून स्त्री जाणिवांचे वर्णन करण्यात आले आहे.

जनाक्का शिंदे या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची लहान बहिण होय. जनाक्काचा जन्म १८७८ च्या कार्तिक महिन्यात झाला. (पवार:२००४:३०) त्या वि.रा.शिंदे यांच्याहून पाच वर्षाच्या लहान होत्या. त्यांच्या बालपणीच्या आठवणी लिहिताना महर्षींनी लिहिले आहे की, ही आमच्या घरात पहिलीच मुलगी जणू, म्हणून जनाक्का ही आमच्या सर्वांची लाडकी होती.ती लहानपणी अंगाने गुटगुटीत, बुद्धीने चुणचुणीत आणि भांडखोर व बोलकी असे. (शिंदे:१९४०:३६) या अनुभवावरून जनाक्का या बालवयापासूनच कुटुंबात सर्वांच्या लाडक्या होत्या. त्यामुळे त्यांचे संगोपन घरातील इतर मुलांप्रमाणे झाले. भारतीय समाजव्यवस्थेत मुला मुलींची जडण घडण होत असतानाच त्यांच्यामध्ये दुजाभाव केला जातो आणि त्यातूनच स्त्री आणि पुरुष यांच्यातील विषमतेला सुरुवात होते. जनाक्का मात्र या संस्काराला अपवाद होत्या. त्यांच्या आधी घरात मुलगेच जन्माला आले होते आणि त्यानंतर त्यांचा जन्म झाला होता म्हणून त्यांचे सार्वजन कोडकौतुक करत असत. विशेष म्हणजे वडील रामजी यांचा विशेष लळा त्यांच्यावर होता. त्यामुळेच त्यांची जडणघडण बालवयात महर्षी शिंदे यांच्याबरोबरीने झाली होती. स्त्रीवादासंदर्भात ही जडणघडण अत्यंत महत्वाची असते. कारण पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्री ही दुय्यम म्हणून वाढवली जाते आणि तिच्यावर अनेक निर्बंध लादले जातात. यासंदर्भात सीमान द बोहुआर ही प्रसिद्ध पाश्चात्य लेखिका म्हणते, स्त्री ही जन्मात नाही, तर ती घडवली जाते. समाज जे गुणविशेष स्त्रीमध्ये गृहीत धरतो. त्यातील फारच थोडे प्रत्येक स्त्रीमध्ये निसर्गात: असतात. स्त्रीची बहुतांश वैशिष्ट्ये समाजाने तिच्यामध्ये जबरदस्तीने रुजवलेली असतात. (बोहुआर:२४५) हे बोहुआर यांचे विधान जनाक्काच्या आयुष्यात आलेल्या अनुभवांना लागू पडते.

**जनाक्काची संसारकथा:**

जनाक्काचा विवाह तत्कालीन रूढीनुसार बालवयातच झाला. यासंदर्भात महर्षी शिंदे यांनी आठवण सांगताना लिहिले आहे की, माझे वय त्यावेळी ९ वर्षाचे, भाऊचे १४ वर्षाचे आणि बहिणीचे ४ वर्षाचे होते. माझे वय आणि माझ्या बहिणीचे वय फारच अक्षम्य होते. माझ्या बहिणीचे सालंकृत कन्यादान केले. तिचे सासरचे



Scanned by CamScanner

घराणे आसंगीचे गोपाळबाबा कामते नावाचे सदगृहस्त. या सुखवस्तू घरातील एकुलता एक लाडका मुलगा कृष्णराव याचे वय विवाहावेळी ८-९ वर्षाचे होते. (शिंदे:१९४०:४२-४३) विवाह जरी ४ वर्ष वयात झाले असले तरी सासरी जाण्यायोग्य वय होईपर्यंत जनाक्का या माहेरीच होत्या वडील रामजी यांनी मुलीचे बुद्धी चातुर्य पाहून तिला शिक्षण देण्याचे ठरवले होते. त्यांच्या या निर्णयाला सभ्य गृहस्थ असलेले सासरे गोपाळबाबा कामते यांचाही पाठींबा होता. त्यामुळे जनाक्काचे माहेरी असतानाच मराठी चौथ्या इयत्तेपर्यतचे शिक्षण झाले होते. तत्कालीन समाजव्यवस्थेत मुलींच्या शिक्षणाला सार्वत्रिक अशी मान्यता नव्हती त्या काळात त्यांना शिक्षण देण्याचे धाडस वडील रामजीनी जनाक्काचे सासरे गोपाळराव कामते यांच्या सहमतीने केले होते.याबाबत महर्षी शिंदे यांनी आपल्या आठवणीत लिहिले आहे की, 'माझ्या बहिणी त्या वेळच्या मुलींच्या शाळेतल्या जवळ जवळ पहिल्याच विद्यार्थिनी होत्या!'(शिंदे:१९४०:१३२) जनाक्काना शिक्षण देण्याचा विचार सद्विचार तत्कालात त्यांच्या वडिलांनी केला त्यामुळे त्यांच्या जडणघडण दुजाभावाने न होता मुलांच्या बरोबरीने झाली. हा शिंदे यांच्या कुटुंबाचा गुणधर्म होता म्हणूनच की काय, पुढे महर्षी शिंदे यांनी जनाक्काच्या जडणघडनित महत्वाची भूमिका निभावली.

जनाक्काचे वय १२ वर्ष पूर्ण होताच तिची सासरला नांदण्यासाठी म्हणून पाठवणी झाली. त्या वेळी तिचे शिक्षण मराठी चौथ्या इयत्तेपर्यंत झाले होते. (पवार:२००४:३०) त्यांचा विवाह ज्या कृष्णराव कामते यांच्याशी झाला होता त्यांना मात्र शिक्षणातकसल्याही प्रकारचा रस नव्हता किंबहुना त्यांनी शिक्षण घेतलेच नव्हते. त्यामुळे सासरी गेल्यानंतर त्यांचे सासरच्या मंडळीकडून मोठ्या प्रमाणात कोडकौतुक होऊ लागले. मराठी स्पष्ट बोलणारी, टापटीपिने पोशाख करणारी, स्वभावाने चुणचुणीत म्हणून घरातील सर्वजण तिला नावाजित असत. सास-याला तर तिचे एवढे कौतुक की तिला कुठे ठेवू अन कुठे नको असे होऊन गेले. एकदा सरकारी अर्जाचा तुकडा तिने सर्वाना वाचून दाखवला तेंव्हा तिला पोटासी धरून ते उद्गारले, माझी बाळ ती. आता दिवाणजीची कशाला जरूर आहे? माझी पोरच घरचा हिशेबठिशेब पाहील.(पवार:२००४:३१) एकीकडे जनाक्काचे कौतुक होत असतानाच कृष्णराव कामते या त्यांच्या पतीकडून मात्र त्यांचा द्वेष होऊ लागला. या द्वेषाचे कारण केवळ आणि केवळ पारंपारिक पौरुषीमानसिकता होती. कारण जनाक्काच्या शिक्षणाचे घरची मंडळी कौतुक करीत असताना कृष्णरावांची मित्रमंडळी मात्र त्यांना 'आता काय तुझी बायको ओसरीवर जमाखर्चाच्या वह्या घेऊन दिवाणजीचे काम पाहणार, अन तू मात्र ठोंब्यासारखा शेतात बैलाच्या शेपट्या पिरगाळीत राहणार' (पवार:२००४:३१) अशा शब्दात हिणवत होती. यापाठीमागे तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्री शिक्षणास फारसी मान्यता प्राप्त झालेली नव्हती. किंबहुना समाजाची पुरुषप्रधान मानसिकता हे स्वीकारण्यास तयार नव्हती. या



Scanned by CamScanner

पौरुषी मानसिकतेनेच जनाक्का आणि त्यांचे पती कृष्णराव यांच्यात हा दुरावा निर्माण केला. आणि त्याचा परिणाम ज्या सासरच्या मंडळींकडून त्यांचे आणि शिक्षणाचे कौतुक होत होते त्याच मंडळींकडून त्यांना मुलाच्या वर्तनावरून फटकून वागवले जाऊ लागले. सभ्य गृहस्त असलेले सासरे गोपाळबावा आणि पती कृष्णराव यांच्यात सतत जानाक्कांच्यावरून भांडणे होऊ लागली. यावेळी जनाक्कांचे वय १३-१४ वर्षाचे होते. आणि सासरच्या मंडळींकडून त्यांच्या स्त्री असण्यावरून आणि त्यांना दिल्या जाणा-या सन्मानावरून हा वाद निर्माण झाला होता.जनाक्कावरील या संकटाचे वर्णन करताना महर्षींनी म्हटले आहे, हे महर्षी शिंदे यांचे विधानही तत्कालीन 'माझ्या दोन बहिणींपैकी मोठी बहिण जनाक्का हिचा सासरी फार चाल होत होता. तिची सासू मोठी खस्त बाई होती आणि नवरा फार अविचारी व उर्मटपणे वागत होता. जनाक्का चार इयत्तेपर्यंत लिहावयाला वाचावयाला शिकली होती आणि तिचा नवरा केवळ अक्षरशत्रू होता. येवढेच ह्या छळाचे कारण होते.'(शिंदे:१९४०:१५५) ही स्त्रियांच्या कर्तृत्वाचा, योग्यतेचा वत्यांच्या बुद्धिमत्तेचा सन्मान नाकारणारी मानसिकता या समाजव्यवस्थेतील पितृसत्ताक पद्धतीतून पुढे आली होती. ही पितृसत्ताक जीवनप्रणाली स्त्रीवादाच्या विचारप्रणालीत मुख्य अडथळा होती.या मानसिकतेच्या विरोधात जाऊन स्वताचे अस्तित्व निर्माण करण्याचे धाडस जनाक्कानी आपले बंधू महर्षी शिंदे यांच्या प्रोत्साहनाने केले.

जनाक्काच्या या संसार कथेतील होत असलेल्या ससेहोलपटीपासून त्यांना मुक्त करण्याचे धाडस महर्षी शिंदे यांनी केले. त्याचबरोबर प्रचलित असलेल्या स्त्रीत्वाच्या आपल्या भूमिकेला आणि समाजव्यवस्थेने लादलेले दुय्यमत्व झुगारून देण्याचे जनाक्का शिंदे यांनी दाखवलेले धाडस वाखाणण्याजोगे आहे. यावेळी महर्षी शिंदे इंटरमिजीयटचे शिक्षण घेत होते आणि त्यांची सुधारणावादी मतांकडे ओढ लागलेली होती. त्यातच स्वताच्या बहिणी संदर्भात होत असलेल्या अन्याय पाहून त्यांची स्त्रीवादी भूमिका निश्चित झाली. यासंदर्भात ते म्हणतात की, माझ्या सुधारणेच्या मंताला आणि सामान्यता स्त्रीजातीसंबधी करुण्यालाही पूर येत चालला होता. अशा वेळी माझ्या प्रत्यक्ष बहिणीवर तिची वागणूक इतकी पवित्र व स्वभाव सहनशील असूनही असा प्रसंग आलेला पाहून मी बेफाम झालो. माझ्या कानावर जनाक्काच्या छळाची वार्ता विशेषता तिच्या क्रूर नव-याची दुसरी बाई घरी आणून ठेविली हे ऐकल्याबरोबर मी माझ्या आईबाबांना जनाक्काला एकदम आमचे घरी आणावयाचा आग्रह केला.' (शिंदे:१९४०:१५६) हा त्यांचा जनाक्काला घरी आणण्याचा विचार तात्पुरता नव्हता तर कायमचाच होता. अशा प्रकारे लग्न आलेल्या विवाहितेला तिच्या इच्छेनुरूप जगता येत नसेल तर तिने सासरी न राहता माहेरी यावे हा विचार तत्कालात सामाजरुढीच्या विरोधात जाणारा होता. परंतु त्यांनी त्याचा विचार न करता आपल्या बहिणीला तिच्या मर्जीप्रमाणे जगता यावे



Scanned by CamScanner

यासाठी हा निर्णय घेतला. जनाक्कानेही हा निर्णय तत्कालीन सामाजिक रोषाला न जुमानता स्वीकारला.

हे महर्षी शिंदे आणि स्वता जनाक्का शिंदे यांचे विचार तत्कालीन समाजव्यवस्थेला छेद देवून स्त्रीवादाचा पुरस्कार करणारे होते. त्यांचे वडील रामजी शिंदे यांच्या भूमिकेवरून हे लक्षात घेता येईल. ते महर्षी शिंदे यांच्या जनाक्काला सासरी न पाठवण्याच्या निर्णयासंदर्भात म्हणतात. 'अरे बाबा, एक वेळ हत्ती पोसवेल पण लग्न झालेली, नवरा हयात असलेली मुलगी घरी ठेवता येणे अशक्य आहे. तू चार बुके शिकून आला आहेस तेंव्हा कानात वारे शिरल्यासारखे वागू नकोस! ज्याच्याशी जन्माची गाठ बांधली आहे त्याच्याकडेच तिला पाठवूया' (पवार:२००४:३२) हा त्यांचा विचार म्हणजे पितृसत्ताक व्यवस्थाप्रणीत स्त्रीला स्वताचे अस्तित्व असते हे नाकारणारा विचार होता. विवाहित स्त्री म्हणजे पुरुषाची मालकी अथवा मालमत्ता असते हाच पारंपारिक विचार तत्कालीन समाजव्यवस्थेत प्रचलित होता. त्यानुसार मुलीचे वडील या नात्याने त्यांनी समाजरोष ओढवू नये या विचारातून ही भूमिका स्वीकारली असावी. परंतु महर्षी शिंदे मात्र यासंदर्भात रोखठोक भूमिका घेतात आणि आपल्या वडिलांना समजावताना म्हणतात की, अशा स्थितीत मी काही तिला सासरी पाठवणार नाही. तिचा नवरा आपणहून तिला नांदवण्यास घेऊन जाण्यासाठी आला तरच तिला मी पाठवीन एरव्ही माझ्या जीवात जीव असे पावेतो मी काही तिला अंतर देणार नाही.(पवार:२००४:३२) हा शब्द महर्षी शंदे यांनी शेवटपर्यंत पाळला. त्यांनी हा निर्णय केवळ बहिण म्हणून नव्हे तर स्त्री जातीबद्दल त्यांना वाटणारी करुणा यातून घेतला होता. आपल्या बहिणीला पुरुषी वर्चस्व झुगारून देऊन सन्मानाने जगता यावे हा त्यांचा ध्यास होता. यात स्त्रीवादी विचारधारेची बीजे दिसतात.

**जनाक्काचा शिक्षणासाठी संघर्ष:**

महर्षी शिंदे यांनी आपल्या बहिणीला म्हणजेच जनाक्काला सासरी न पाठवता आपल्या समवेत पुण्याला आणले आणि तथाकथित सुधारणावाद्यांच्या शिक्षण संस्थांमध्ये शिक्षणाची व्यवस्था होते का पाहू लागले. त्यांनी सर्वप्रथम पुण्यात विधवा अथवा निराधार स्त्रियांना शारदा सदन मध्ये शिक्षण देण्याचे काम करणा-या पंडिता रमाबाई यांच्याकडे ते गेले. पंडिता रमाबाई यांनी प्रथमता जनाक्काच्या निराधारपनाची कहाणी ऐकली आणि काही अटी घालून शिकवण्याची तयारी दाखवली. त्यात जनाक्काला शारदा सदन मध्ये प्रवेश दिल्यानंतर पाच वर्षेपर्यंत सुट्टी मिळणार नाही ही एक अट होती. महर्षी शिंदे यांनी या अटी मागचा रमाबाई यांचा हेतू ओळखला होता. पंडिता रमाबाई शारदा सदन मध्ये प्रवेश देवून जनाक्काला पाच वर्षाच्या कालावधीत कुटुंबापासून दूर ठेवून ख्रिस्ती बनवू पाहत होत्या. या वेळी महर्षी शिंदे यांनी त्यांना उत्तर दिल्याचे आपल्या आठवणीत नमूद केले आहे. 'ज्या



Scanned by CamScanner

नवमतवादाचे पाणी ही पंडिता प्याली होती त्याचे चार थेंब माझ्याही पोटात गेले होते.मी उत्तर दिले, बाई शिक्षणात अडथळे आणण्यासाठी मी बहिणीस तुमच्याकडे पाठवण्याचे करांच नाही. तिने ख्रिस्ती होण्यास अडथळे आणू ही भीती तुम्हास असणे साहजिक आहे... मुलीच्या हिताची काळजी निदान तुमच्या इतकी तरी मला व मुलीच्या आईबापाला आहेच हा विश्वास तुम्हाला असावा. तुमच्या शिक्षणाने मुलगी आपखुशीने व अक्कलहुशारीने ख्रिश्ती होऊ लागल्यास निदान मी अडथला आणणार नाही. तिच्यावर तिला न कळत, जबरी तर राहोच, पण भूलभूलावणी होऊ लागली तर ते मी सहन करणार नाही.' (शिंदे:१९४०:१६८) हा महर्षी शिंदे यांचा विचार स्त्रीवादी भूमिका स्पष्ट करणारा होता. एकीकडे आपल्या बहिणीच्या शिक्षणाचा विचार ते करत होते तर दुसरीकडे तिच्यावर स्त्री म्हणून कसल्याही प्रकारची बळजोरी होता नये हा त्यांचा विचार स्त्रीवादाला चालना देणारा ठरला.

जनाक्काच्या शिक्षणासंदर्भात आणखी एक तथाकथित स्त्री सुधारणावादाचा अनुभव त्यांना आला तो म्हणजे महर्षी कर्वे यांच्या संदर्भात. शारदा सदन मध्ये जनाक्काच्या शिक्षणाची काही व्यवस्था होत नाही हे स्पष्ट झाल्यानंतर ते पुण्यात स्त्री शिक्षणासाठी सुरु झालेल्या हिंगणे येथील कर्वेंच्या अनाथबालिकाश्रम संस्थेतही त्यांना प्रवेश मिळाला नाही. यासंदर्भात ते म्हणतात की, 'माझ्या बहिणीला आश्रमात घेता काय ह्या माझ्या प्रश्नाला, ब्राह्मनेत्तरांच्या मुलीना घेण्याचा हा काळ नाही असे प्रोफेसर अण्णासाहेबांनी सांगितले व माझ्या बहिणीला आश्रमात घेण्याचे साफ नाकारले.' (शिंदे:१९४०:१६८) हा त्यांचा अनुभव तत्कालीन समाजजीवनातील श्रेष्ठ कनिष्ठ जात परंपरेतून आलेले पहावयास मिळतात. स्त्री सुधारणा चळवळीतील हा एक मोठा अनुभव जनाक्का व महर्षी शिंदे यांना आला. शेवटी ते पुण्यातील प्रसिद्ध हुजूर पगेतील मुलींच्या हायस्कुलात जनाक्काला प्रवेश मिळाला. परंतु तिथेही त्यांना तत्कालीन परंपरा आणि स्त्री म्हणून त्यांच्या शिक्षणासाठी झालेला विरोध याचा भयंकर अनुभव आला.यासंदर्भात ते म्हणतात हिंदू विवाहित स्त्री म्हणजे कोणत्या भयंकर तुरुंगात असते, ह्याची कल्पना मला नव्हती. शाळेचे अधिकारी जनाक्काच्या नव-याची तिच्या शिकण्यास परवानगी मागू लागले... नव-याच्या हरकतीची जबाबदारी मी घेतली. तिला शाळेत प्रवेश मिळाला.' (शिंदे:१९४०:१६९) हिंदू धर्म परंपरेत विवाहित स्त्रीला नव-याच्या परवानगी शिवाय कुठलीही गोष्ट करण्याचा अधिकार नव्हता हे यावरून सिद्ध होते. तेंव्हा या परंपरा नाकारून स्त्रीवादी भूमिकेतूनच महर्षी व जनाक्का यांनी शिक्षण मिळवण्यासाठी प्रयत्न केले होते. एव्हढेच नव्हे तर विवाहानंतर स्त्रीला पतीचे कुलनाम (आडनाव) धारण करावे लागते परंतु पुन्हा शाळेत प्रवेश घेताना मात्र महर्षी शिंदे यांनी स्वीकारलेल्या जबाबदारीवरून जनाक्काचे सासरचे आडनाव कामते ऐवजी माहेरचे शिंदे हेच आडनाव लावण्यात



Scanned by CamScanner

आले. इथून पुढे त्या जनाक्का शिंदे याच नावाने प्रसिद्ध झाल्या. हा परंपरा मोडीत काढून स्वीकारलेला दृष्टीकोन स्त्रीवादाला चालना देणारा ठरला.

हुजूरपागा शाळेत शिकत असताना जनाक्कांच्या जीवनसरनीत मोठा बदल झाला. त्या इतर मुलींच्या मानाने वयाने मोठ्या होत्या. त्यामुळे इतरांच्या तुलनेत समजूतदारपणा अधिक होता. हुजूर पागेतील शिक्षण घेण्याच्या काळात जनाबींच्या वृत्तीचा मोकळेपणा, आनंदीपणा, खिलाडूवृत्ती, प्रकट होत होता. त्याचप्रमाणे जनाबाईच्या ठिकाणी दुसरी एक गंभीर वृत्ती होती ती सहानुभावाची; निरपेक्ष सेवावृत्तीची आणि जबाबदारीची.(पवार:२००४:३६) त्यामुळे त्यांच्यात सेवाभाव मोठ्या प्रमाणात वृद्धिंगत होण्यास हुजूर पागेतील शिक्षणाने मोठी मदत झाली. त्यामुळेच पक्षाघात झालेल्या शांता सुखठनकर हिची सेवा सुश्रुषा करून जनाक्काने शांताला तिच्या पायावर उभे केले. शांताची सेवा सुश्रुषा करण्याची उर्मी हा जनाबाई यांच्या सेवाभावी वृत्तीचा, उदात्त अशा माणुसकीचाच अविष्कार होता.(पवार:२००४:३६) हा सेवाभाव स्त्रियांकडे स्त्रीवादी दृष्टीकोनातून पाहण्याच्या त्यांच्यात विकसित झालेल्या क्षमतेतून पुढे आला होता.हीच त्यांच्याकडे असलेली सेवाभावी वृत्ती पुढील काळात त्यांच्या सुधारणाविषयक कार्यात पहावयास मिळते.

**पनवेलमध्ये शिक्षिका म्हणून काम:**

जनाक्काची तब्येत सातत्याने बिघडत असे त्यामुळे महर्षी शिंदे यांचे प्रार्थना समाजातील एक जवळचे मित्र बलभीम केसकर यांनी जनाक्काला पनवेल येथील म्युनिसिपाल शिक्षिकेची जागा त्यांनी स्वीकारावी असा सल्ला दिला. पनवेलची हवा कोरडी असे असल्यामुळे हवा पालट होईल आणि शाळेतील कामात वेळ जाईल हा यापाठीमागील हेतू होता. पनवेल येथील शाळेच्या इमारतीजवळ जनाक्काच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. जनाक्काची इंग्रजी सहावी पूर्ण झालेली होती. शिवाय गायन, शिवणकला इत्यादी विषय त्यांना अवगत होते. जनाक्काची पात्रता ध्यानात घेऊन मुलींच्या शाळेत हेडमिसत्रेसच्या जागेवर दरमहा २५/रु. पगारावर शिक्षिका म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. (पवार:२००४:१९५) ही जनाक्काच्या संघर्षाचे फलित होते की त्यांना या नौकरीच्या अध्यामातून आर्थिक स्वावलंबन प्राप्त झाले होते. जनाक्का या केवळ स्त्रीवादाच्याच पुरस्कर्ते होत्या असे नाही तर त्यापलीकडे जाऊन त्यांच्या मनावर कुटुंबातून जो संस्कार झाला होता तो समतेचा पुरस्कार करणारा होता. मग तो स्त्री प्रश्नांच्या अनुषंगाने असेल किंवा समाजातील जातिभेदाच्या संदर्भात असेल त्या समतावादी विचाराच्या पुरस्कर्त्या होत्या.

या सर्व विचारांचा परिणाम होऊन त्या पनवेलमध्ये परिचित मुसलमान कुटुंबात त्यांचा वावर व त्यांच्या लग्नकार्यात त्यांनी घेतलेला भाग यामुळे व



Scanned by CamScanner

एकंदरीतच त्यांच्या सुधारकी वागण्याने पनवेलच्या कर्मठ मंडळीचा त्यांच्यावर रोष झाला होता.(पवार:२००४:१९५) यावरून आपल्याला लक्षात येईल की जनाक्का एकींकडे पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात उभ्या राहून समतेचा पुरस्कार करत होत्या व हजारो वर्षांपासून स्त्रियांना नाकारलेले अधिकार मिळवत होत्या. तर दुसरीकडे समजतील जात व पंथभेद याचाही फटका त्यांना पनवेल मध्ये वावरत असताना बसत होता. एकाच वेळेला जनाक्का एक स्त्री म्हणून स्वताचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी झगडत होत्या तर दुसरीकडे समाजातील प्रचलित धर्म जातीतील विषमतावादी व्यवस्थेसी संघर्ष करण्याचाही अनुभव त्या घेत होत्या. आपल्या बहिणीला पनवेल येथे होत असलेला कर्मठ लोकांचा विरोध कमी करावा या हेतूने महर्षी शिंदे प्रार्थना समाजाचा प्रचार करण्याच्या हेतूने व्याख्यान देण्यासठी पनवेल येथे आले. यावेळी त्यांनी नुकतेच अस्पृश्योद्धाराचे कार्य हाती घेतले होते. त्यांनी व्याख्यानात नुकत्याच अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीसाठी स्थापन केलेल्या संस्थेची माहिती सांगितलीव अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याची निकड प्रतिपादली तेंव्हा जुन्या मताच्या लोकांची व्याख्यात्याबद्दल व व्याख्यात्याच्या बहिणीबद्दल प्रतीकुलातच वाढली. (पवार:२००४:१९६) त्यातच समतावादी विचाराचे पुरस्कर्ते रामजीबाबा यांनी पनवेलचे गंगारामभाऊ सुभेदार या लष्करातून पेन्शन घेतलेल्या महार गृहस्थाला आपल्या घरी चहाला बोलावले. त्यामुळे तर कर्मठ लोकमत अधिक प्रतिकूल बनले. गावातील सनातनी लोकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. या प्रतीकुलतेमुळेच शेवटी त्यांना अल्पावधीतच पनवेल येथील आपली नौकरी सोडावी लागली.

**अस्पृश्यता निवारणाच्या कार्यातील अनुभव:**

पनवेल येथील अनुभव लक्षात घेऊन महर्षी शिंदे यांना वाटले की प्रतिकूल परिस्थितीत नौकरी करणे जनाक्काला शक्य नाही. अशा स्थितीत आपण सुरु केलेल्या कामात जनाक्काने हातभार लावावा यासाठी त्यांना बोलावून घेतले. निराश्रित सहाय्कारी मंडळीच्या सेवासदन मध्ये ते राहत होते. परंतु निराश्रित सहाय्यकारी मंडळीच्या उद्देशानुसार अस्पृश्य वर्गाची सेवा करणा-यांनी त्यांच्या वस्तीत जाऊन राहिले पाहिजे हा दंडक होता. त्यानुसार जनाक्का आणि आई वडील यांच्यासह महर्षी शिंदे मुंबईतील ग्लोब मिलच्या चाळीत जाऊन राहिले होते. या ठिकाणाहूनच कार्य करीत असताना जनाक्काला आलेले अनुभव महर्षी कर्वे यांनी लिहिले आहेत.राही नावाच्या वृद्ध बाईला असाध्य जखमा झाल्या होत्या म्हणून प्रयत्नपूर्वक तिला जे.जे. हॉस्पिटलमध्ये पोहचविण्यात आले. दुस-या दिवशी तिचा समाचार घेण्यासाठी जनाबाई तेथे गेल्या असता वृद्ध राहीबाईच्या मुलाने तिला घरी नेल्याचे समजले. जनाबाई तिच्या घरी समाचाराला गेली असता त्या मुलाकडून त्यांना शिव्यांचा प्रसादही मिळाला. (पवार:२००४:२३४) या अनुभवांमध्ये त्यांना एक स्त्री म्हणून



Scanned by CamScanner

आलेले अनुभव व अस्पृश्यता निवारणाचे करत असलेले कार्य दोन्ही कारणांमुळे त्या वृद्ध राहीबाईच्या मुलाने आपल्या आईवर दवाखान्यात उपचार करण्याएवजी उलट जनाक्काने उपचारासाठी दाखल केल्याचा राग डोक्यात घेऊन आईला दवाखान्यातून घरी नेले. राहीबाईच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी गेले असता त्यांनाच शिव्या दिल्या. यापाठीमागे एका स्त्रीने आपल्या कौटुंबिक प्रश्नात हस्तक्षेप करावा ही पुरुषी मानसिकतेला धक्का देणारी बाब होती. ही पुरुषप्रधान संस्कृती जनाक्काने स्वीकारलेल्या सुधारणावादी कार्याच्या आड येणारी ठरली.

राहीबाई प्रमाणेच अस्पृश्य समाजातील एक वृद्ध बाई अंथरूणास खिळली होती. सततअंथरुणावर पडून राहिल्याने तिच्या पाठीला जखमा झाल्या होत्या.जनाबाई रोज तिची पाठ शेकण्यास जात. पाठीला शेकण्यासाठी पाणी तापविण्यासाठी जनाबाई चुलीकडे जाऊ लागल्या तेंव्हा बाई, तुमचे फार उपकार आहेत. पण माझ्या चुलीला शिवू नका... जनाबाईनी आपल्या घरचा स्टोव्ह नेऊन त्यावर पाणी तापवून त्या बाईची पाठ शेकली.(पवार:२००४:२३४) ही जनाक्काच्या अस्पृश्यता निवारण कार्यातील कथा उद्बोधक आहे त्याचबरोबर जात-पितृसत्ताक व्यवस्थेचा तत्कालीन स्त्रियांच्या मनावरील प्रभाव दर्शवणारी आहे. तेंव्हा अशा परिस्थितीत जात-पितृसत्ताक परंपरेचे वर्चस्व झुगारून देऊन जनाक्कानी केलेले हे कार्य जनाक्कातील स्त्रीवादी दृष्टीकोन आणि भारतीय परंपरेत ख्रिश्चन मिशन-यांप्रमाणे सेवाभाव रुजवणारा आहे.असाच एक अनुभव त्यांना तत्कालीन मुरळीप्रथेच्या विरोधात काम करताना आला. महर्षी कर्वे यांनी तत्कालात मुरळी प्रथेच्या विरोधात जनजागृती करण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले होते. मुरळी प्रथा म्हणजे देवाला मुलगी वाहण्याची अथवा देवाच्या नवे मुलगी सोडण्याची ही पद्धत कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या काही भागात मुरळी या नावाने प्रसिद्ध होती. अर्थात ही प्रथा सबंध भारतात विविध नावानी प्रचलित आहे.

विवाहित दाम्पत्याला आपत्य प्राप्ती होत नसल्यास देवाला मुलगी सोडण्याचा नवस केला जाई. आणि कालांतराने आपल्या पोटी जन्म घेतलेल्या मुलीस देवाच्या नावे सोडून दिल्या जाई. परंतु या प्रथेतून मुरळी सोडलेल्या मुलींच्या आयुष्यात मात्र अनेक समस्या निर्माण होत असत त्या वेगळ्याच परंतु अशा प्रकारची धर्माच्या नावाखाली परंपरेने रूढ झालेल्या या प्रथेतून स्त्री ही एक सेवेसाठी वाहिलेली वस्तू आहे. अशा प्रकारची मानसिकता समजात निर्माण होऊन स्त्रियांच्या वाट्याला समाजमान्य दुय्यमत्व बहाल होते आणि ते स्त्रियांकडूनही स्वीकारले जात होते म्हणून अज्ञानी जणांना जागरूक करणे आणि या समाजविघातक प्रथेतून स्त्रियांना मुक्त करणे या उदात्त हेतूने महर्षी शिंदे यांनी हा या प्रथेच्या विरोधात आवाज उठवायला सुरुवात केली होती. हा विचार जनाक्का शिंदे यांनीही स्वीकारला आणि अशा मुरळी सोडलेल्या मुलींना समाज स्वीकारायला तयार नव्हता त्यावेळी



Scanned by CamScanner

त्यांनी अशा पिडीत महिलांना जवळ करून त्यांना नवे आयुष्य द्यावयाचे काम त्यांनी केले. अशीच मुरळी सोडलेली एक मुलगी पुण्याच्या डॉ. मेन ह्यांच्याकडून सदनामध्ये पाठवण्यात आली.त्या मुलीला अंगभर वाईट रोग जडला होता. तिची कुठेही व्यवस्था होत नसल्याने निर्वाणीचा उपाय म्हणून तिला सदनात पाठवले. पण मुलाबाळांनी भरलेल्या सदनात ही मुलगी ठेवणे धोक्याचे होते. म्हणून भायखळा येथील शाळेजवळ एक स्वतंत्र खोली घेऊन ह्या मुलीला घेऊन जनाबाई तेथे राहिल्या. ही मुलगी फार आडदांड स्वभावाची होती. बरेच दिवस तिने फार त्रास दिला. तथापि, तिला तसेच शिकवून बरी केल्यावर आणि टी चांगली शिकल्यावर तिचा योग्य स्थळी विवाह करून देण्यात आला.(पवार:२००४:२३५) स्त्रियांच्या भावना ओळखून त्यांच्या सुधारणेसाठी स्वताला झोकून देऊन कार्य करणा-या जनाक्का शिंदे यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन मात्र ब-याच अंशी उपेक्षित राहिलेला पहावयास मिळतो.

महाराष्ट्रातील समाज सुधारणा चळवळीमध्ये महात्मा फुलेंच्या बरोबरीने स्वताला समर्पित करणा-या भारतातील पहिल्या स्त्रीवादी सुधारक सावित्रीबाई फुले यांच्यानंतर जर कोणी मोलाची कामगिरी बजावली असेल तर ती जनाक्का शिंदे यांनी बजावली होती. त्यांचे चरित्र चारित्र्य आणि जीवन ध्येयमार्ग त्यांचे बंधू विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्या समवेतच सहभागी होऊन व्यथित केले. जनाबाई ह्या आण्णांच्या पर्सनल असिस्टंट जवळ जवळ होत्या. आण्णांचा सर्व विश्वास ह्यांच्यावर होता.आण्णा पुरुषांमध्ये काम करीत  जनाबाई त्यांच्या बरोबरीने स्त्रियांमध्ये काम करीत.(चव्हाण:२००१:२४) जनाक्कांचे स्त्रियांमधल्या कार्याची प्रेरणा त्यांचे बंधू विठ्ठल रामजी शिंदे हे असले तरी त्यात भावना मात्र स्त्रीवादाची होती हे नक्कीच स्वीकारावे लागेल. याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांच्या आयुष्याचा झालेला शेवट. या संदर्भात रा. ना. चव्हाण यांनी लिहिले आहे की, जनाबाई यांच्या मृत्यूचे कारण देखील मोठे चिंत्य व भयानक आहे. त्यांच्या घरी भाडेकरी राहत होते. भडेक-याच्या घरची बाई स्टोव्हने पेटली जनाक्काना शेवटी दोन्ही डोळयांनी दिसत नव्हते. पेटलेल्या बाईने जनाबाईस मिठी मारली. यामुळे जनाबाईन अग्निप्रसाद मिळाला व यामुळे पेटलेली शेजारीण व स्वता तिला सोडवाव्यास जाणा-या जनाबाई दोन्ही पेटून मरण पावल्या. याप्रमाणे परोपकारातचत्यांचा अंत ओढवला.(चव्हाण:२००१:२७) ही ख-या अर्थाने स्त्रियांच्या हाकेला शेवटच्या श्वासापर्यंत परोपकारी भावनेने वाहून घेण्याची त्यांची वृत्ती होती.

सारांशाने जनाक्का शिंदे यांचा काळ हा जरी स्त्रीवाद ही संकल्पना रूढ अर्थाने वापरण्यास सुरुवात होण्याच्या आधीचा असला तरी त्यांचे व्यक्तिगत जीवन व त्यांनी एक स्त्री म्हणून तत्कालीन प्रचलित परंपरांना छेद देऊन स्वकर्तृत्वाने केलेले



Scanned by CamScanner

कार्य अर्थातच नंतरच्या काळातील स्त्रीवादी चळवळीला प्रेरणा देणारे मार्गदर्शक स्वरूपाचे असेच आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. कोतापल्ले नागनाथ (संपा.) ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना,कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद,२०१०.

२. कदम शंकरराव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे साहित्य आणि कार्य,स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, २०००.

३. चव्हाण वैशाली (सपा), महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शोध व बोध अक्षर श्रद्धांजली पुष्प, वाई, २००१.

४. पवार गो.मा.महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य, लोकवाङ्मय गृह,मुंबई,२००४.

५. पवार गो.मा. (संपा), निवडक विठ्ठल रामजी शिंदे, साहित्य अकादमी नवी दिल्ली, २०१२.

६. मंगुडकर मा.प., शिंदे लेखसंग्रह, ठोकळ प्रकाशन,पुणे, १९६३.

७. शिंदे वि. रा., माझ्या आठवणी व अनुभव,वत्सला साहित्य प्रकाशन, पुणे,१९४०.



Scanned by CamScanner